**महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ**
**राष्ट्रीय सुगी पश्चात तंत्रज्ञान संस्था (NIPHT)**

स. नं. ३९८-४००, सीआरपीएफ (CRPF) कॅम्प शेजारी, जुना पुणे-मुंबई हायवे, तळेगाव दाभाडे, ता. मावळ, जि. पुणे - ४१०५०६. **फोन:** (०२११४) २५५४८०, **फॅक्स:** (0२११४) २५५४८१, **ई-मेल:** htc_td@yahoo.co.in **वेबसाईट:** www.nipht.org,

# ई-निविदा

## भाडोत्री वाहन पुरवठा करणेबाबत

**ठिकाण:**
राष्ट्रीय सुगी पश्चात तंत्रज्ञान संस्था (NIPHT), स. नं. ३९८-४००, सीआरपीएफ कॅम्प शेजारी, जुना पुणे-मुंबई हायवे, तळेगाव दाभाडे, ता. मावळ, जि. पुणे - ४१०५०६, महाराष्ट्र, भारत.

**निविदा क्रमांक:** NIPHT/ Hired Vehicle /e-Tender/०२/२०२६-२७

**संपर्काचा पत्ता: संचालक,**
राष्ट्रीय सुगी पश्चात तंत्रज्ञान संस्था, स. नं. ३९८-४००, सीआरपीएफ कॅम्प शेजारी, जुना पुणे-मुंबई हायवे, तळेगाव दाभाडे, ता. मावळ, जि. पुणे - ४१०५०६, महाराष्ट्र, भारत.

**ई-निवीदा सुचना**
**वृत्तपत्रामध्ये प्रकाशित करणेसाठी**

**महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ (MSAMB) पुणे, यांची**
**राष्ट्रीय सुगी पश्चात तंत्रज्ञान संस्था (NIPHT)**

स. नं. ३९८-४००, सीआरपीएफ (CRPF) कॅम्प शेजारी, जुना पुणे-मुंबई हायवे, तळेगाव दाभाडे, ता. मावळ, जि. पुणे - ४१०५०६. **फोन:** (०२११४) २५५४८०/२५५४८१, **ई-मेल:** htc_td@yahoo.co.in
**वेबसाईट:** www.nipht.org,

**ई निविदा**

एनआयपीएचटी (NIPHT) खालील विविध कामासाठी अनुभवी संस्थांकडून ई-निविदा मागवित आहे. सदर ई-निविदा दि.१०/०४/२०२६ पासून http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध होईल. निविदा सादर करण्याचा अंतिम दिनांक २८/०४/२०२६ आहे. त्याचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | कामाचा तपशिल | अंदाजीत रक्कम रु. | बयाना रक्कम रु. | टेंडर शुल्क रु. |
|---|---|---|---|---|
| १ | भाडोत्री वाहन पुरवठा करणे. | ६० लाख | १ टक्का निविदेच्या खर्चानुसार | ६०००/- |

**संचालक,**
**रा.सु.प.तं.सस्था**

**स्पर्धात्मक ई-निविदा (Competitive e-Bid)**

**विषय:** भाडोत्री वाहन पुरविणे.

**ठिकाण:**

राष्ट्रीय सुगी पश्चात तंत्रज्ञान संस्था (NIPHT),

स. नं. ३९८-४००, सीआरपीएफ (CRPF) कॅम्प शेजारी, जुना पुणे-मुंबई हायवे, तळेगाव दाभाडे, ता. मावळ, जि. पुणे - ४१०५०६ , महाराष्ट्र, भारत.

---

**निविदा वेळापत्रक आणि तपशील**

| **तपशील** | **दिनांक आणि वेळ** |
|---|---|
| ई-निविदा संदर्भ क्रमांक | NIPHT/Hire Vehicle/e- Tender/०२/२०२६-२७ |
| प्रसिद्धीचा दिनांक | १०/०४/२०२६, सकाळी ११.०० वाजता |
| दस्तऐवज विक्री सुरू होण्याचा दिनांक | १०/०४/२०२६ , दुपारी ०३.०० वाजता |
| दस्तऐवज विक्री संपण्याचा दिनांक | २८/०४/२०२६ संध्याकाळी ०५.०० वाजता |
| निविदा पूर्व बैठक (Pre-bid Meeting) | १५/०४/२०२६, सकाळी ११.०० वाजता |
| निविदा सादर करण्यास सुरुवात | १७/०४ /२०२६, सकाळी ११.०० वाजता |
| निविदा सादर करण्याचा अंतिम दिनांक | २८/०४ /२०२६, संध्याकाळी ०५.०० वाजता |
| तांत्रिक निविदा उघडण्याचा दिनांक | ३०/०४ /२०२६, सकाळी ११.०० वाजता |
| निविदा शुल्क (Tender Fee) | **रु. ६०००/-** (परतावा न मिळणारे / Non-Refundable) |

---

**निविदा उघडण्याचे ठिकाण:**

संचालक कार्यालय, राष्ट्रीय सुगी पश्चात तंत्रज्ञान संस्था (NIPHT), स. नं. ३९८-४००, सीआरपीएफ कॅम्प शेजारी, जुना पुणे-मुंबई हायवे, तळेगाव दाभाडे, ता. मावळ, जि. पुणे - ४१०५०६, महाराष्ट्र, भारत.

---

**सविस्तर ई-निविदा सूचना**

**(वेबसाईटवर प्रसिद्ध करण्यासाठी)**

**महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाची राष्ट्रीय सुगी पश्चात तंत्रज्ञान संस्था (NIPHT)** स. नं. ३९८-४००, सीआरपीएफ (CRPF) कॅम्प शेजारी, जुना पुणे-मुंबई हायवे, तळेगाव दाभाडे, ता. मावळ, जि. पुणे - ४१०५०६. **फोन:** (०२११४) २५५४८०, **फॅक्स:** (०२११४) २५५४८१, **ई-मेल:** htc_td@yahoo.co.in **वेबसाईट:** www.nipht.org,

**ई-निविदा सूचना**

संचालक, राष्ट्रीय सुगी पश्चात तंत्रज्ञान संस्था (NIPHT), तळेगाव दाभाडे, जि. पुणे यांच्यामार्फत एनआयपीएचटी (NIPHT), तळेगाव दाभाडे येथे भाडोत्री वाहन पुरविणे करण्यासाठी प्रतिष्ठित आणि अनुभवी संस्थांकडून ई-निविदा मागविण्यात येत आहेत.

| **अ.क्र.** | **कामाचा तपशिल** | **अंदाजीत रक्कम रु.** | **बयाना रक्कम रु.** | **टेंडर शुल्क** |
|---|---|---|---|---|
| १ | भाडोत्री वाहन पुरविणे | ६० लाख | १ टक्का निविदेच्या खर्चानुसार | ६०००/- |

**निविदेचा तपशील खालीलप्रमाणे आहे:**

१. कोरी निविदा कागदपत्रे महाराष्ट्र शासनाच्या **http://mahatenders.gov.in** या वेबसाईटवर दि. १० /४/२०२६ ते २८ /४/२०२६ पर्यंत डाउनलोड करण्यासाठी उपलब्ध असतील.
२. निविदा सादर करण्याचा कालावधी दि. १७ /०४/२०२६ ते २८/४/२०२६ रोजी सायंकाळी ०५.०० वाजेपर्यंत आहे.
३. तांत्रिक निविदा (Technical Bid) दि. ३०/४/२०२६ रोजी सकाळी ११:00 वाजता उघडली जाईल.
४. व्यावसायिक निविदा (Commercial Bid) उघडण्याची तारीख स्वतंत्रपणे कळविली जाईल.
५. निविदापूर्व बैठक (Pre-bid Meeting) दि.१५ /४/२०२६ रोजी सकाळी ११:00 वाजता NIPHT, तळेगाव दाभाडे येथे होईल.
६. निविदा शुल्क आणि बयाना रक्कम (EMD) महाराष्ट्र शासनाच्या ई-पेमेंट गेटवेद्वारे ऑनलाइन भरणे आवश्यक आहे.
७. निविदा केवळ **http://mahatenders.gov.in** या वेबसाईटवर ऑनलाइन सादर करावी. पोस्ट, टेलिग्राम, फॅक्स, ई-मेल किंवा कुरिअरद्वारे पाठवलेल्या निविदांचा विचार केला जाणार नाही.

**निविदाधारकांसाठी आवश्यक पात्रता निकष:**

१) कंपनीचे नोंदणी प्रमाणपत्र (Registration Certificate).

२) ईएमडी (EMD) आणि सर्व ऑनलाइन पेमेंट भरल्याचा पुरावा.

३) मागील ३ वर्षांचे उत्पन्न कराचे विवरणपत्र ( सन २०२२-२३,२०२३-२४, २०२४-२५ )

४) कंपनीचे जीएसटी (GST) नोंदणी प्रमाणपत्राची प्रत.

५) कंपनीचे पॅन (PAN) कार्डची प्रत.

६) मागील 3 वर्षांतील ग्राहकांची (Clients) यादी.) निविदा दस्तऐवजावर स्वाक्षरी करणाऱ्या व्यक्तीचे शिक्का आणि स्वाक्षरीसह अधिकार पत्र (Power of Attorney).

८) मागील तीन वर्षांत केलेल्या कामांच्या प्रमाणपत्रांच्या साक्षांकित प्रती.

९) पुरवठादार यांचे वार्षीक उत्पन्न १ कोटी असणे आवश्यक आहे.

१०) शासकीय किंवा खाजगी संस्था/कंपनी दिलेल्या कंत्राटांच्या/कामाच्या वाटपाच्या पत्रांच्या प्रती.

**टीप:** वरीलपैकी कोणतेही दस्तऐवज लागू नसल्यास, त्याचे कारण नमूद करावे.

काही **सुधारणा/शुद्धिपत्रक (Corrigendum)** असल्यास ते केवळ http://mahatenders.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध होईल. कोणतीही कारणे न देता सर्व किंवा कोणतीही निविदा स्वीकारण्याचा किंवा नाकारण्याचा अधिकार संचालक,NIPHT ने राखून ठेवला आहे.

**संचालक**
राष्ट्रीय सुगी पश्चात तंत्रज्ञान संस्था, तळेगाव दाभाडे, जि. पुणे
(महाराष्ट्र)

**कामाचा कालावधी**

राष्ट्रीय सुगी पश्चात तंत्रज्ञान संस्था (रा.सु.प.तं.संस्था) तळेगाव दाभाडे संस्थेकरीता भाडोत्री वाहन पुरविणेच्या निविदेचा कालावधी सन २०२६-२७ व २०२७-२८ या वित्तीय वर्षासाठी राहिल. कामाचा कालावधी वर्क ऑर्डर दिलेपासून दोन वर्षा पर्यंत राहिल. सदर कामाची मुदत वाढविण्याचा अधिकार, संचालक, रा.सु.प.तं.संस्था , तळेगाव दाभाडे यांना राहिल.

| | | |
|---|---|---|
| १ | निवीदा मुल्य | रु.६०,००,०००/- |
| २ | सुरक्षा ठेव (security deposit) | रु.३,००,०००/- |
| ३ | अनामत रक्कम (EMD) | रु.६०,०००/- |
| ४ | निवीदा शुल्क | रु.६,०००/- |
| ५ | निवीदा दिनांक | १०/०४/२०२६ |
| ६ | प्री बीड मीटीग | १५/४/२०२६ सकाळी ११.०० वा. |
| ७ | निवीदा भरण्याची अंतीम तारीख | २८/०४/२०२६ सायंकाळी ०५.०० वा |
| ८ | निवीदा उघडण्याची तारीख व वेळ तांत्रिक लिफाफा | दि.३०/४/२०२६ सकाळी. ११.०० वा. |

**कामाची अंदाजपत्रकीय रक्कम**

राष्ट्रीय सुगी पश्चात तंत्रज्ञान संस्था (रा.सु.प.तं. संस्था) तळेगाव दाभाडे भाडोत्री वाहन पुरविणे या कामाची एकूण अंदाजपत्रकिय रक्कम रुपये **६०,००,०००/- (अक्षरी रुपये- साठ लाख )** इतकी आहे.

**निविदा शुल्क(Tender fee)**

राष्ट्रीय सुगी पश्चात तंत्रज्ञान संस्था (NIPHT) तळेगाव दाभाडे संस्थेकरीता भाडोत्री वाहन पुरविणे या कामाची निविदा संच डाऊनलोड करण्याचे शुल्क रुपये ६,०००/- इतके आहे. निविदा शुल्क ऑन लाईन भरावयाचे आहे. निविदा शुल्क रक्कम ही वीना-परतावा आहे.

**बयाना रकक्म ( EMD)** राष्ट्रीय सुगी पश्चात तंत्रज्ञान संस्था (रा.सु.प.तं. संस्था) तळेगाव दाभाडे संस्थेकरीता भाडोत्री वाहन पुरविणे या कामाच्या ई निविदेची बयाना रक्कम रुपये ६०,००० /- इतकी आहे. बयाना रक्कम ऑनलाईन भरावयाची आहे. बयाना रकमेवर व्याज मिळणार नाही. निविदा नामंजूर होणा-या निविदाकारांची बयाना रक्कम ही ऑनलाईन पध्दतीने परत मिळेल, निविदा प्रक्रियेत सहभागी होणाऱ्या निविदाकाराने निविदा प्रक्रियेत कोणत्याही टप्प्यावर माघार घेतल्यास बयाना रक्कम जप्त करण्यात येईल.

**सुरक्षा ठेव(Security Deposit)**

ई निविदा मंजूर निविदाकारास एकूण ५ टक्के सुरक्षा ठेव रक्कम रुपये ३,००,०००/- ही डिमांड ड्राफ्टव्दारे/बॅक गॅरन्टी/FD कार्यारंभ आदेश दिल्यावर १५ दिवसाच्या आत रा.सु.प.तं. संस्थेकडे (NIPHT) जमा करावी लागेल. सुरक्षा ठेव निविदाकारास निविदा मंजूर झाल्याचे कळविलेल्या दिनांकापासून सात

दिवसामध्ये भरावी लागेल अन्यथा निविदा रद्द करण्यात येईल. निविदेची मुळ मुदत किंवा वाढलेली मुदत संपल्यानंतर बयाना रक्कम ठेकेदाराला त्याचेकडून झालेले संस्थेचे नुकसान तथा येणे वजा करुन एक महिन्यांनी परत करण्यात येईल. सदर रकमेवर व्याज मिळणार नाही.

**निविदा भरणे**

राष्ट्रीय सुगी पश्चात तंत्रज्ञान संस्था (रा.सु.प.तं. संस्था) तळेगाव दाभाडे संस्थेकरीता भाडोत्री वाहन पुरविणे व्दि लिफाफे पध्दतीने ई निविदा मागविण्यात येत आहे. त्यापैकी लिफाफा क्रमांक १ तांत्रिक लिफाफा व लिफाफा क्रमांक २ व्यापारी/दराचा लिफाफा आहे.

ई निविदा http://mahatenders.gov.in व रा.सु.प.तं.संस्था Website-www.nipht.org.in या संकेतस्थळावर दिनांक १०/४/२०२६ रोजी सकाळी ११.०० पासुन दिनांक २८/४/२०२६ सायं. ५.०० पर्यंत अपलोड करता येतील. निविदाकाराने तांत्रिक लिफाफा क्रमांक १ मध्ये प्रमाणपत्रे/विवरणपत्रे/आवश्यक कागदपत्रांच्या स्वयंसाक्षांकित छायांकित प्रती व व्यापारी/दराचा लिफाफा क्रमांक २ मध्ये Bills of Quantity (BOQ) अपलोड करावा.

**निविदा पूर्व बैठक (Pre-bid Meeting)**

निविदाकारांच्या शंका समाधानासाठी निविदा पूर्व बैठक दिनांक रोजी १५/४/२०२६ सकाळी ११.०० वाजता राष्ट्रीय सुगी पश्चात तंत्रज्ञान संस्था (रा.सु.प.तं. संस्था) तळेगाव दाभाडे संस्थेच्या कार्यालयामध्ये आयोजित केली आहे. निविदा पूर्व बैठकीसाठी निविदाकार यांनी स्वत: किंवा प्राधिकर पत्र देऊन प्रतिनिधीस उपस्थित राहता येईल. बैठकीस उपस्थित असणारे निविदाधारकच निविदा भरण्यास पात्र असतील. सदर सभेचे इतिवृत्त हे http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर अपलोड करण्यात येईल व हे इतिवृत्त निविदेचा भाग समजण्यात येईल. या इतिवृत्तावर कोणत्याही शंकेस/प्रश्नास उत्तर देण्यात येणार नाही.

**निविदा उघडणे**

http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर ऑनलाईन पध्तीने प्राप्त झालेल्या निवीदा दिनांक ३०/४/२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता संचालक, राष्ट्रीय सुगी पश्चात तंत्रज्ञान संस्था , तळेगाव दाभाडे यांचे कार्यालयात उघडण्यात येतील. निवीदा उघडतांना प्रथम तांत्रिक लिफाफा क्रमांक १ उघडण्यात येईल.तांत्रिक लिफाफ्यामध्ये मागविण्यात आलेल्या कागदपत्रांच्या आधारे निवीदा पात्र/अपात्र ठरविण्यात येईल.

# राष्ट्रीय सुगी पश्चात तंत्रज्ञान संस्था

०१ रा.सु.प.तं.संस्थेमध्ये दोन वर्षे ( सन २०२६-२७ , २०२७-२८) या कालावधीकरिता दर कराराने वाहन व्यवस्था पुरवण्या करिता निविदा पध्दतीने मा.संचालक,रा.सु.प.तं.संस्था यांच्या वतीने तत्सम कामाचा अनुभव असलेल्या ठेकेदारांकडून निविदा मागवण्यात येत आहे.

०२ राष्ट्रीय सुगी पश्चात तंत्रज्ञान संस्थाही शेतकरी, विद्यार्थी, व महाराष्ट्र शासनाच्या वेगवेगळ्या विभागाचे अधिकारी व कर्मचारी यांना प्रशिक्षण देणारी भारतातील एक अग्रगण्य स्वायत्त संस्था आहे.

०३. रा.सु.प.तं.संस्थेमध्ये वेगवेगळया प्रकारचे प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित केले जातात. सदर प्रशिक्षण कार्यक्रमामध्ये क्षेत्र भेटी, अभ्यास सहली ही आयोजित केल्या जातात. येथे येणारे प्रशिक्षणार्थीसाठी वेळोवेळी सुसज्ज व सुस्थितीत असलेल्या वाहनांची आवश्यकता भासते, तसेच कार्यालयीन कामकाजासाठी देखील वाहनांची आवश्यकता लागते

०४. कार (सेलेरिओ /स्विफ्ट डिझायर /i-१०,i२०)इनोव्हा / ईरटीका इ. या गाडयांचे साधे आणि एसी,तसेच बसचे (२X२) १७ आसनी, २०आसनी, ३२ आसनी, ३६ आसनी व ४०आसनी,४६आसनी ए.सी व साधे वाहनांचे दरपत्रक सोबतच्या विहीत नमूना मध्ये भरावेत.

## ई निविदाबाबतच्या अटी व शर्ती खालील प्रमाणे

०१. ई निविदा दोन पध्दतीने अपलोड करणे आवश्यक आहे.

०२. सर्व प्रथम लिफाफा क्र.१ उघडण्यात येईल व निविदेत नमूद केल्यानुसार आवश्यक ती कागदपत्रे / प्रमाणपत्रे सादर केले आहेत याबाबत खात्री करून घेतल्यानंतरच निविदा दराबाबतचा लिफाफा क्र.२ उघडण्यात येईल.

०३. आवश्यक कागदपत्रे/ प्रमाणपत्रे व निविदा दर सादर केल्याचे आढळून न आल्यास अशी निविदा अपात्र ठरविण्यात येईल.

### <u>लिफाफा क्रमांक १ (तांत्रीक)</u>

१. किमान तीन वर्षाचे अनुभव प्रमाणपत्र-

**२** एजन्सी / कंपनीची माहिती

मालकाचे नांव

कार्यालयाचा संपूर्ण पत्ता, दूरध्वनी क्रमांक, मोबाईल क्रमाक, फॅक्स नंबर, ई-मेल पत्ता.

३ जी.एस.टी .प्रमाणपत्राची छायांकित प्रत.

४. पॅन कार्ड नंबर व प्रमाणपत्राची छायांकित प्रत व आधारकार्ड छायांकित प्रत

**५.** मागील ३ आर्थिक वर्षाचे आयकर विवरण पत्र सादर करावे
(सन-२०२२-२३,२०२३-२४ व २०२४- २५) आर्थिक उलाढाल १ कोटी असावी.

६. स्वत:च्या मालकीच्या किमान वेगवेगळया प्रकारच्या ०२ कार व ०५ बस असल्या पाहिजेत. वाहननोंदणी प्रमाणपत्रांच्या प्रती जोडाव्यात.(**टॅक्स पावतीसह**) ०५ बस स्वत:ची नसल्यास इतर संस्थेकडून बस पुरविण्याबाबतचे हमी पत्र

७. आपण सेवा पुरवठा करत असलेल्या संस्थेच्या/कंपनीची यादी व त्या कार्यालयाचे पत्ते, व

दूरध्वनी क्रमांक. (किमान ३ संस्थेच्या/कंपनीची नावे)

८. वर अ. क्र. ०६ येथे नमूद केलेल्या स्वत:च्या मालकीच्या वाहनांखेरीज दुस-या संस्थेची

वाहने पुरविणार असाल तर संबंधित संस्थेचे संमतीपत्र असले पाहिजे.

**९.** पुरवठादार यांचे वार्षीक उत्पन्न १ कोटी असणे आवश्यक आहे.

**वरील अ. क्र. ०१ ते ०९ येथील सर्व कागदपत्रे / प्रमाणपत्रे आवश्यक असून त्यांची पूर्तता न झाल्यास लिफाफा क्र.२ उघडला जाणार नाही.**

## लिफाफा क्रमांक २ (आर्थिक)

**लिफाफा क्रमांक २ मध्ये** फक्त परिशिष्ट - 'अ'विहीत नमुन्यामध्ये निविदेच्या दराबाबत माहिती सादर करावी. सदरील माहिती लेटरहेडवर दिनांक,सही शिक्यानिशी सादर करावी.(**निविदेच्या परिशिष्ट अ मधील सर्व वाहनांच्या दराचे सर्व रकाने भरणे अनिवार्य आहे**, परिशिष्ट अ मध्ये नमूद केलेले वाहन व्यतिरिक्त इतर वाहन पुरवठा मागणीनुसार केल्यास त्याचे कोटेशन त्या त्या वेळी सादर करुन मंजुरीअंती जो दर अंतिम होईल त्या दराने वाहन पुरवठा बील अदा करणेत येईल.)

**अ**)लिफाफा क्र.१ उघडल्यानंतर आवश्यक दस्तऐवजांची पूर्तता केली असल्याची खात्री केल्यानंतरच लिफाफा क्र. २ उघडण्यात येईल.

**ब**)लिफाफा क्र. २ उघडण्याच्या तारखेपासून ते निविदा स्विकृत करण्याचा कालावधी दोन महिने राहील.

**परिशिष्ट अ**

**एजन्सीचे नाव :** **दिनांक:**

| अ.क्र. | वाहनाचा प्रकार | स्थानिक दर प्रति ४० कि.मी. पर्यंत (४.५) तास दर रु. | स्थानिक दर प्रति ८० कि.मी.पर्यंत (९.० तास) दर रुपये | स्थानिक दर प्रति ८० कि.मी.पेक्षा जास्त प्रति कि.मी. दर रुपये | बाहेरील प्रवास ३०० कि.मी. पर्यंत दर रुपये | बाहेरील प्रवास प्रवास ३०० कि.मी. पेक्षा जास्त प्रति कि.मी. दर रुपये |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | Celerio/i10/AC | | | | | |
| २ | Celerio / i 10 /nonAC | | | | | |
| ३ | Swift Dezire/ i20/AC | | | | | |
| ४ | Swift Dezire/i 20/non AC | | | | | |
| ५ | Innova AC | | | | | |
| ६ | Innova Non AC | | | | | |
| ७ | Ertica- AC | | | | | |
| ८ | Ertica- NonAC | | | | | |
| ९ | 17- Seater AC | | | | | |
| १० | 17 -Seater Non AC | | | | | |
| ११ | 20- Seater AC | | | | | |
| १२ | 20- Seater Non AC | | | | | |
| १३ | 32- Seater AC | | | | | |
| १४ | 32- Seater non AC | | | | | |
| १५ | 36- Seater AC | | | | | |
| १६ | 36- Seater non AC | | | | | |
| १७ | 40 -Seater AC | | | | | |
| १८ | 40- Seater NON AC | | | | | |
| १९ | 46- Seater AC | | | | | |
| २० | 46- Seater NON AC | | | | | |
| २१ | Volovo Bus AC | | | | | |

## परिशिष्ट अ

## अटी व शर्ती

१. सोबत जोडण्यात आलेले वाहनांचे दरपत्रक रा. सु. प. तं. संस्थेमधील सर्व विभागांसाठी व कार्यालयांसाठी लागू राहील.

२. मान्य झालेल्या दरानुसार व संस्थेतील मागणीनुसार वाहनांचा पुरवठा दोन वर्ष करणे आपणावर बंधनकारक असेल. कराराचा कालावधी कामकाज आदेश दिलेपासून दोन वर्षाचा( २४ महिने) राहील.

३. सदर कामाचे कंत्राट मंजूर झाल्यास त्याबाबतच्या कराराचा मसुदा रा.सु.प.तं.संस्थेकडुन घेऊन तो शासन नियमानुसार आवश्यक रुपये ५००/-रकमेच्या शासकीय मुद्रांक पेपरवर तयार करून द्यावा लागेल. मुद्रांक पेपरचा खर्च ठेकेदारास करावा लागेल.

४. अंदाजित उलाढालीच्या ५% म्हणजे रुपये ३,००,०००/- एवढी रक्कम सुरक्षा ठेव म्हणून (बिन व्याजी) ठेकेदाराने रा.सु.प.तं. संस्थेकडे भरणा करणे आवश्यक आहे.

५. आपणास कार्यालयाकडून वाहनाची वर्दी ( बसेस साठी किमान ०१ दिवस आधी व इतर वाहनांसाठी किमान ०२ तास अगोदर ) देण्यात येईल.

६. वाहनासाठी वर्दी मिळाल्यानंतर वाहन विहीत वेळेत विहीत पत्त्यावर पोहोचणे आवश्यक आहे.

७. आपणाकडून पुरविण्यात येणारे वाहन मागणी केलेल्या प्रकाराचे व सुस्थितीत असणे आवश्यक आहे. तसेच त्याची देखभाल योग्य प्रकारे केलेली असावी.

८. आपणाकडून पुरविण्यात आलेल्या वाहनात दोष आढळून आल्यास किंवा वाहन विहीत कालावधीत उपलब्ध न झाल्यास, वाहन चालकाचे गैरवर्तन आढळून आल्यास त्या वर्दीच्या देयकातून २०% रक्कम दंड म्हणून कपात करण्यात येईल. याबाबत रा.सु.प.तं. संस्थेकडुन कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

९. प्रवास करते वेळी लागणाऱ्या वाहनांच्या व चालकांच्या सर्व कायदेशीर कागदपत्रांची पूर्तता केलेली असावी. प्रवासादरम्यान काही कायदेशीर प्रश्न निर्माण झाल्यास ठेकेदार त्यास पूर्णपणे जबाबदार राहील.

१०. प्रवासादरम्यान अपघात झाल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी ठेकेदाराची राहील.

११. वाहनावर पाठविण्यात आलेला वाहनचालक आज्ञाधारक व चांगल्या वर्तणुकीचा, प्रामाणिक व स्वच्छ गणवेशात असावा.

१२. शासननिर्णयाप्रमाणे विहीत दरानुसार जी.एस.टी. मंजूर करण्यात येईल.

१३. ठेकेदाराने टोल, पार्किग व इतर राज्यांचे कर यांची प्रतिपूर्ती प्रत्यक्षात आकारल्यानुसार देयकाव्दारे रा.सु.प.तं.संस्थेस सादर करावी. रा. सु. प. तं. संस्थेकडुन अदा करण्यात येईल. वाहन पुरविताना आवश्यक तेवढे इंधन / टोल / पार्किग यासाठी लागणारी रक्कम संबंधित वाहन चालकाकडे असल्याची खात्री करुनच वाहन पुरविण्यात यावे.

१४.वाहनाची वेळ व किलोमीटर याची गणना रा.सु.प.तं.संस्थेकडुन संस्थेच्या कार्यालयापासून परत रा.सु.प.तं.संस्थेच्या कार्यालयापर्यंत करण्यात येईल. तसेच वाहनाची नोंद संस्थेच्या गेटवर सुरक्षारक्षक यांकडे करणे बंधनकारक राहील (वाहनाचा प्रकार, वेळ, तारीख, प्रवाशांची संख्या,सुरवातीचे रडींग,अखेरचे रिडींग, वाहनचालक माहिती इत्यादी .)

१५. वाहन रा.सु.प.तं.संस्थेमध्ये येण्यापुर्वी वाहन तयारीसाठी कोणताही जादा कालावधी (१/२ तास,१ तास ) अनुज्ञेय असणार नाही. प्रत्यक्षात वाहन रा.सु.प.तं.संस्थेमध्ये आल्याची वेळ व प्रवासानंतर वाहन परत रा.सु.प.तं.संस्थेमध्ये आल्याची वेळच परिगणनेसाठी ग्राहय धरण्यात येईल.

१६. वाहनाचा एक पूर्ण दिवस रात्री १२.०० वाजता संपेल, परंतू रात्री १२.०० ते पहाटे ३.०० या वेळेत वाहनाचा प्रवास संपल्यास त्यास दुसरा दिवस लागू होणार नाही. रात्री १२.०० ते ३.०० या कालावधीच्या प्रवासाचे भाडे परिशिंष्ट अ मधील नमूद केल्याप्रामणे प्रतितासाने अदा करण्यात येईल. पहाटे ३.०० नंतर दुसरा दिवस सूरु होईल. हीच पध्दत पुढील प्रत्येक दिवसासाठी असेल. वाहनात काही तांत्रिक दोष निर्माण झाल्यास तेवढा कालावधी एकूण कालावधीतून वजा केला जाईल.

१७.निविदे सोबत जोडलेल्या **परिशिष्ट 'अ'** मध्ये नमूद केलेली वाहने उपलब्ध करुन देण्याबाबतचा तपशील देण्यात आलेला आहे.

१८. वाहन पुरवठादाराच्या सेवेत व्यत्यय आल्यास रा.सु.प.तं.संस्थेमार्फत इतर वाहन पुरवठादारांकडून मिळेल त्या दराने तत्सम सेवा उपलब्ध करुन घेण्यात येईल व त्यापोटी होणा-या अतिरिक्त खर्चाच्या वसुलीस वाहनपुरवठादार पात्र राहील.

१९. वाहनांची देयके ठेकेदाराने साठवून एकाच वेळी देण्यापेक्षा वेळोवेळी सादर करावीत, डयूटी स्लीप/देयके अर्धवट किंवा खाडाखोड असणे त्याच बरोबर डयुटी स्लीपवर वाहन वापरणा-या

अधिका-याची स्वाक्षरी, नाव व अचूक कि. मी. नमूद नसलेल्या देयकांची रक्कम अदा करण्यात येणार नाही. तसेच डयुटी स्लीपवर वाहन वापरणाऱ्या अधिकाऱ्याचे नाव, पदनामासह तसेच रा.सु.प.तं.संस्थेमध्ये वाहन दाखल झाल्याची दिनांकासह वेळ व सुरूवातीचे कि.मी. तसेच प्रवासाहून वाहन परतल्यानंतर रा.सु.प.तं.संस्थेमध्ये दाखल झाल्याची दिनांकासह वेळ व शेवटचे कि.मी. व इतर नोंदी घेऊन संबंधित वाहन वापरणाऱ्या अधिकाऱ्याची डयुटी स्लीपवर नावासह स्वाक्षरी घेण्याची जबाबदारी ठेकेदाराची असेल.

२०. वाहनाची वर्दी दिल्यानंतर वर्दीच्या वेळेपूर्वी दोन तास अगोदर वर्दी रद्द करण्याची सूचना केल्यानंतर सदर वाहनाची वर्दी रद्द समजण्यात यावी आणि ज्या प्रकारच्या वाहनाची मागणी केली आहे त्याच प्रकारचे वाहन पुरविणे बंधनकारक राहील.

२१. ठेकेदाराने वाहनाचे देयके सादर केल्यानंतर १५ दिवसांनी अदा करण्यात येईल.

२२. या व्यतिरिक्त ठेकेदारांच्या कोणत्याही अटी व शर्ती मंजूर करण्यात येणार नाहीत.

वरील सर्व अटी व शर्ती मला मान्य आहेत.

प्राधिकृत व्यक्तीची सही,कंपनीचा / संस्थेचा शिक्का

**संचालक**

राष्ट्रीय सुगी पश्चात तंत्रज्ञान संस्था, तळेगाव दाभाडे